

# महाकवि कालिदास

महाकवि कालिदास हा जगत्प्रसिद्ध कवि आहे. बहुतेक मराठी वाचकांना तो त्यांचे ‘मेघदूत’ हे काव्य व ‘शाकुन्तल’ हे नाटक यावरून माहीत आहे. कृष्णशास्त्री चिपळूणकरांपासून तो सर चिंतामणराव देशमुखांपर्यंत अनेक मराठी कवींनी मेघदूताचे भाषांतर केले आहे व अण्णासाहेब किर्लोस्करांनी आपल्या शाकुन्तलाच्या प्रयोगाने एकेकाळी महाराष्ट्र गाजवून सोडला होता. पण कालिदासाचे कर्तृत्वच या दोन ग्रंथापुरतेच मर्यादित नाही. त्याने मालविकाग्निमित्र हे मालविका व शुंग राजा अग्निमित्र यांच्या प्रणयकथेवरील नाटक. विक्रमोर्वशीय हे पुरूरवा व उर्वशी यांच्या मीलनाचे व विरहाचे चित्रण करणारे नाटक, देखील लिहिले आहे. त्याचप्रमाणे रघुवंश हे रामाच्या वंशावरील, कुमारसंभव हे कार्तिकाच्या जन्मासंम्बंधीचे महाकाव्य त्याचप्रमाणे ऋतुसंहार हे सहा ऋतूंच्या सौंदर्याचे वर्णन करणारे खंण्डकाव्य लिहिले आहे. या व्यतिरिक्त अनेक ग्रंथ कालिदासाच्या नावावर प्रसिद्ध आहेत पण ते महाकवि कालिदासाचे नाहीत याबद्दल तज्ज्ञांचे एकमत आहे.

शाकुंतल व मेघदूत यांच्या मराठी अवतारावरून मराठी वाचकांना कालिदासाची रसवंती परिचित असली तरी कालिदासाच्या कृतीचे सौंदर्य भाषांतरात उतरविणे जवळ जवळ अशक्यच असल्यामुळे कालिदासाची खरी योग्यता त्यांच्या प्रत्ययास आली आहे असे म्हणवत नाही.

कालिदासाच्या नाटकांचे सौंदर्य अनुभवास येण्यासाठी भाषेव्यतिरिक्त आणखी एक अडचण आहे. ती म्हणजे कालिदासाची नाटके ज्या तऱ्हेने प्रस्तुत केली जात ती पद्धत आता विसरली गेली आहे. नृत्य व संगीत ही, ही नाटके प्रस्तुत करण्याची माध्यमे होती. म्हणजे हिंदी सिनेमा प्रमाणे मधे मधे करमणुकीसाठी नाच व गाणी घालण्यात येत होती असे नव्हे तर सारे कथानक व पात्रांचे व्यक्तिदर्शन संगीत व नृत्य यांच्या द्वारे होत होते. या पद्धतीचे मर्म न समजून ही नाटके प्रस्तुत केल्यामुळे त्यांचे उच्च नाट्यगुण प्रकट होत नाहीत.

कालिदासाचे काव्यकर्तृत्व समजण्यास अशा अडचणी असल्या तरी मुळातून त्याची काव्ये वाचणाऱ्या लोकांना तो जगातला महान कवि आहे याचा प्रत्यय येतो व जगातील पुष्कळशा प्रमुख भाषात त्याच्या कोणत्या ना कोणत्या ग्रंथाचे भाषांतर झालेले आहे.


## डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे


एवढ्या जगत्प्रसिद्ध भारतीय कविच्या बाबतीत मात्र ऐतिहासिक माहिती काहीच उपलब्ध नाही. तो केव्हा झाला, कुठे झाला याचा पत्ता नाही, व त्याच्या आयुष्याबद्दल आख्यायीकांव्यतिरिक्त काहीही उपलब्ध नाही. असे असल्यामुळे या प्रश्नाबद्दल तर्क करण्यास संशोधकांना मोकळे रान सापडले आहे.

या मोकळ्या रानात संचार करणाऱ्या संशोधकात सर्वात प्रसिद्ध प्रा. मिराशी हे आहेत.

कालिदासाच्या कालाबद्दल दोन मर्यादा निर्विवाद आहेत. त्याचे मालविकाग्निमित्र हे नाटक अग्निमित्र शुंगावर लिहिले आहे. अग्निमित्र शुंगाचा काल खि. पू. १५० हा आहे. तेव्हा कालिदास या पूर्वी झाला असण्याचा संभव नाही. तसेच

*कालिदासाचे जन्मस्थान व जन्मकाल याविषयी संशोधकात अद्याप एकवाक्यता झालेली नाही. कारण त्या संबंधी निश्चित असा पुरावा उपलब्ध झाला नाही. जे काही तर्कवितर्क पुढे येत आहेत ते सारे अंदाजपंचे दाहोदरशे अशा स्वरूपाचे आहेत. काही संशोधकांनी लावलेले शोध तर जावई शोधाच्याच जातीचे आहेत असे म्हणावे लागेल. कालिदास हा बंगालमध्ये जन्मलेला असावा असे बंगाली संशोधकांना वाटते. कारण काय तर बंगाली लोकांच्या जीवनात कालिमातेच्या पुजेला विशेष स्थान आहे. तेव्हा कालिदास नावावरून हा बंगाली कवि असावा असे त्यांचे म्हणणे. वडाची साल पिंपळाला लावण्यासारखा हा प्रकार ! अफजुल खानाच्या वधाच्या प्रसंगी छत्रपतींनी वाघनखे वापरली होती की जांबिया वापरला होता, किंवा नारायणराव पेशव्यांच्या वधाच्या वेळी शनिवार वाड्यात जो मेजवान्यांचा थाट उडाला होता, त्यावेळी भोजनात मुख्य पक्वान्न साखरभात होता की जिलेबी यावर खल करण्यासारखाच हा प्रकार हास्यास्पद नाही का ? पण केवळ तर्कावर भिस्त न ठेवणाऱ्यात जे काही थोडे इतिहास संशोधक महाराष्ट्रात आहेत त्यात नागपूरचे डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे यांची गणना निश्चितपणे करता येईल. प्रस्तुत लेखात त्यांनी या विषयाची साधक - बाधक चर्चा करून ऐतिहासिक सत्यावर प्रकाश टाकण्याचा प्रांजळपणे प्रयत्न केला आहे.*

कालिदासाचा उल्लेख बाणभट्टाने आपल्या हर्षचरित्रात केला आहे. बाणभट्टाचा काल सम्राट हर्षवर्धनाच्या कारकीर्दीचाच म्हणजे खिस्तोत्तर ६०६ ते ६४५ हा होता. कालिदास याच्या नंतरचा असू शकत नाही.

या मर्यादांच्या मधे कालिदास खिस्तोत्तर ४०० च्या सुमारास चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या पदरी होऊन गेला असे मिराशींनी मांडले आहे.

### विक्रमादित्य आणि कालिदास

या मताबद्दल त्यांनी असा युक्तिवाद केला आहे की कालिदास विक्रमादित्याच्या पदरी होऊन गेला अशी परंम्परा आहे. पण परंम्परेनुसार हा विक्रमादित्य म्हणजे खि. पू. ५८ मधे सुरू होणाऱ्या विक्रमसंवताचा संस्थापक होय. मिराशींच्या मते खि. पू. ५८ मध्ये विक्रमादित्य नावाचा कोणी राजाच नव्हता. तेव्हा कालिदासाचा आश्रयदाता विक्रमादित्य हा चंद्रगुप्त विक्रमादित्य असला पाहिजे. क्षेमेंद्राने आपल्या "औचित्यविचारर्चेत" कालिदासाचे म्हणून कुन्तलेश्वरदौत्य नावाचे एक काव्य उल्लेखिलेले आहे. त्यात कुन्तलेश्वराच्या दरबारी एक राजदूत आला होता. त्याचा कुन्तलेश्वराने अपमान केला असे वर्णन आहे. भोजाच्या शृंगारप्रकाशात विक्रमादित्याने कालिदासाला कुन्तलेश्वराचे काय हालहवाल आहे असे विचारल्याचा उल्लेख आहे. यावरून विक्रमादित्याने कुन्तलेश्वराकडे पाठवलेला दूत म्हणजे कालिदास हे स्पष्ट होते. हा कुन्तलेश्वर म्हणजे मानपुरचा चद्रगुप्तविक्रमादित्याचा समकालीन राष्ट्रकूट राजा असला पाहिजे. हे मानपुर दक्षिण महाराष्ट्रात आहे.

दुसरे असे की वाकाटक वंशातील दुसऱ्या प्रवरसेनाने लिहिलेले सेतुबंध हे प्राकृत काव्य वस्तुतः कालिदासाने रचले. पण विक्रमादित्याच्या आज्ञेवरून त्याने ते प्रवरसेनाच्या नावावर प्रसिद्ध केले असे म्हणतो. हा प्रवरसेन चंद्रगुप्त विक्रमादित्याचा समकालीन होता.

कालिदासाच्या विक्रमोर्वशीयाच्या नावावरून त्याने विक्रमादित्याच्या स्मारकासाठी हे नाटक लिहिले आहे असे वाटते. कारण या नाटकाचा नायक पुरूरवा आहे, विक्रम नाही, तेव्हा नाटकाचे नाव विक्रमोर्वशीय असे ठेवण्याचे काहीच कारण नाही. तसेच "अनुत्सेकः खल विक्रमा लंकारः" या वाक्यात देखील विक्रमादित्याचा उल्लेख आहे.

कालिदासाने नववधूला करण्यात येणाऱ्या उपदेशात 'शुश्रूषस्व गुरून" व 'भाग्येष्वनुत्सेकिनी' म्हणजे 'तू वडिलधाऱ्यांची सेवा कर उत्कर्ष झाला असता गर्व करू नकोस' असे शब्द वापरले आहेत. या पैकी 'भाग्येष्वनुसेक' हे शब्द हुबेहुब वात्सायनाच्या कामसूत्रातले आहेत. संस्कृत महाकवि शास्त्र विचारांचे उल्लेख करीत असताना त्या त्या शास्त्रातील मान्य ग्रंथांतील शब्द जसेच्या तसे उद्घृत करीत असतात. यावरून कालिदास वात्स्यायनाच्या नंतर झाला हे सिद्ध होते. वात्स्यायनाचे कामसूत्र खिस्तोत्तर ३३० च्या सुमारास रचलेले आहे. त्या अर्थी कालीदास ३३० च्या नंतर झाला. चंद्रगुप्त विक्रमादित्याचे राज्यारोहण खिस्तोत्तर ३८० च्या सुमाराचे आहे. तेव्हा ५० वर्षांच्या कालामध्ये वात्स्यायनाचा ग्रंथ भारतभर मान्यता पावला होता असे सहजच दिसते.

कालिदास गुप्तकालात झाला या पुष्कळशा पाश्चात्य

पण्डितांच्या व त्या अनुसार मिराशींच्या मताचा आधार काय आहे हे वर दाखविले आहे. कालिदास विक्रमादित्याच्या पदरी होता हा या मताचा मुख्य आधार आहे. भोजाच्या 'शृंगारप्रकाराच्या' आधारे मिराशी कालिदासाला विक्रमादित्याने दूत म्हणून पाठविले होते असे म्हणतात. या भोजाचा काल खिस्तोत्तर १००० ते १०५५ आहे. म्हणजे मिराशी जो कालीदासाचा काल सांगत आहेत त्याच्या सात शतके नंतरचा आहे. कालिदास विक्रमादित्याच्या पदरी होता असे सांगणारा दुसरा ग्रंथ जोतिर्विदाभरण हा आहे. हा ग्रंथ खि. पू. ३३ मध्ये रघुवंशादी ग्रंथ रचणाऱ्या कालिदासाने लिहिला असे यात म्हटले, लिहिले आहे. पण ऐन्द्र योगामध्ये चन्द्र आणि सूर्य यांचे विषुवृत्तापासूनचे अंतर सारखे असते असे या कालिदासाने लिहिले असल्यामुळे त्याचा मुखवटा गळून पडला आहे.

**पत्यांचा बंगला**

वरील माहितीवरून गणित करून शं. बा. दीक्षित यांनी या ग्रंथाचा काल खिस्तोत्तर १२९२ ठरविला आहे. शिवाय या ग्रंथात कालिदासाबरोबरच पहिल्या शतकातला धन्वन्तरी हा वैद्य, सहाव्या ते आठव्या शतकात केव्हातरी झालेला अमरकोशकार अमरसिंह व खिस्तोतर ५०५ च्या सुमारास झालेला वराहमिहिर हे सर्व विक्रमादित्याच्या पदरी होते असे लिहिले आहे. अशा खोटारड्या ग्रंथाचा पुरावा कालिदासाला विक्रमाच्या दरबारातील रत्न मानण्यास अत्यंत दिशाभूल करणारा आहे.

दुसरे असे की कालिदास विक्रमादित्याच्या पदरी होता असे म्हणणारे सारे ग्रंथकार तो विक्रमसंवत स्थापणाऱ्या विक्रमाच्या पदरी होता अशाच अर्थाने आपले विधान करतात, चन्द्रगुप्त विक्रमादित्याच्या पदरी होता असा त्यांच्या म्हणण्याचा आशय नाही. तेव्हा मिराशींना कालिदासाचा काल खिस्तोत्तर ६०० हा ठरविण्यास हे ग्रंथ उपयोगाचे नाहीत.

विक्रमसंवत स्थापणारा कुणी विक्रमादित्य नव्हताच म्हणून चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या पदरी असलेल्या कालिदासालाच विक्रमादित्याचा राजकवि मानले पाहिजे असे मिराशी म्हणतात. पण विक्रमसंवत स्थापणारा कुणी विक्रमादित्य नव्हता हे मिराशीचे मत झाले. 'शृंगार प्रकाशकार भोजाचे व ज्योतिर्विदाभरणकार "कालिदासाचे" ते मत नाही. त्यांच्या मते कालिदास शककर्त्या विक्रमादित्याच्याच पदरी होता. तेव्हा या ग्रंथकारांचा आधार कालिदासाला गुप्तकालीन ठरविण्यासाठी घेणे समर्थनीय नाही.

कालिदास चंन्द्रगुप्त विक्रमादित्याच्या पदरी होता अशीच मूळ परंपरा होती, पुढे चंद्रगुप्त विक्रमादित्याचे नाव विसरले गेले व त्या जागी संवत्कर्ता विक्रमादित्य या आख्यायिकांच्या नायकाचे नाव घुसडण्यात आले असे मिराशींच्या प्रतिपादनाचे तात्पर्य आहे. पण या प्रतिपादनाचा एकमात्र आधार संवत्कर्ता कुणी विक्रमादित्य नव्हताच हा आहे. या युक्तिवादाचा तोंडवळा पुढील युक्तिवादासारखा आहे. श्रीकृष्ण खरोखर अस्तित्वात नव्हता, त्याचे चरित्र या केवळ आख्यायिका आहेत. त्यामुळे विजयनगरच्या कृष्णदेवराय या राजाच्या पदरी असलेल्या तेनाली राम या शहाण्याचा खरा आश्रयदाता विसरून लोकांनी त्याला भारतीयुद्धकालीन समजल्या जाणाऱ्या श्रीकृष्णाचा समकालीन बनवून टाकले.

आता मिराशींच्या प्रतिपादनातील दुसरे कच्चे दुवे दाखवतो. चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या दूताचा कुन्तलाच्या राजाने अपमान केला असे ते म्हणतात. चंद्रगुप्त विक्रमादित्य हा जवळ जवळ साऱ्या उत्तरभरताचा अधिपती होता. त्याच्या दूताचा कुन्तेश्वरासारखा लहानसा राजा अपमान करील काय ?

असा हा उर्मट कुन्तलेश्वर कोणत्या कुन्तलाचा राजा होता ? मिराशी कुन्तल देश दक्षिण महाराष्ट्रात होता असे म्हणतात. पण आपट्यांचा कोश कुन्तल हैदराबादच्या दक्षिण पश्चिमेस होता असे सांगतो.

मिराशींनी घेतलेले सारे पुरावे चंद्रगुप्त विक्रमादित्या नंतर सात आठशे वर्षांनी आलेल्या ग्रंथातील आहेत या आक्षेपाला एकच अपवाद म्हणजे विक्रमोर्वशीय या नाटकाचे नाव व त्यातील अनुत्सेकः खलु विक्रमालंकार हे वाक्य. विक्रमोर्वशीय या शब्दसमूहाचा अर्थ विक्रमाने म्हणजे पराक्रमाने वश केलेल्या उर्वशीसम्बन्धी आहे.

**कालिदास अग्निमित्र शुंगाचा समकालीन**

तेव्हा विक्रमादित्य या नावाचा विक्रमादित्याशी काही सम्बन्ध नाही. तसेच "अनुत्सेक" खलु विक्रमालंकार म्हणजे विनय हे पराक्रमाचे भूषण आहे. येथेही मिराशींनी विक्रमादित्य ओढून ताणूनच आणला आहे.

शिवाय कालीदास हा जर विक्रमादित्याचा आश्रितच होता तर त्याला आपल्या आश्रयदात्याचे सरळ नाव घेण्याची एवढी भीती का वाटत होती ? त्याची सबळ प्रशस्ती लिहिण्याची त्याला चोरी होती काय ? त्याचे नाव गोवण्यासाठी एवढे उखाणे घेण्याचे त्याला कारण काय ?

मिराशींनी केलेला कामसुत्रांचा उल्लेख त्यांच्या विरूद्ध जातो. कामसूत्र वत्सगुल्मातील काही चालीरीतींचा उल्लेख

करते त्या अर्थी ते ख्रिस्तोत्तर ३३० च्या सुमाराचे असावे असा मिराशींचा युक्तीवाद आहे. हा युक्तीवाद अगम्य आहे. या चालीरीती ३३० इसवीसनाच्या सुमारासच वत्सगुल्मात होत्या. त्यापूर्वी नव्हत्या याला प्रमाण काय ?

वस्तुतः वात्सायन हे चंद्रगुप्त मौर्याचा प्रधान चाणक्य याचेच एक नाव आहे व हा ग्रंथ त्यानेच रचला अशी परंपरा आहे. ती खोटी मानण्यास काहीच सबळ पुरावा नाही.

एकूण कालिदास गुप्तकालात झाला या मताला काहीच पुरावा नाही असे म्हटले तरी चालेल.

वस्तुतः कालिदासाच्या काळाबद्दल कालिदासाच्या ग्रंथातच अविवाद्य पुरावा उपलब्ध आहे. त्याच्या मालविकाग्निमित्र या नाटकात अग्निमित्र राजा असताना प्रजेचे अकल्याण होणे संम्भवतच नाही. अशा अर्थाचे भरतवाक्य आहे. या भरतवाक्याच्या पूर्वी तथापि इतमस्तु भरतवाक्यम असे नेहमीचे भरतवाक्यदर्शक शब्द आहेत. भरतवाक्य हा नाटकाचा भाग नसतो. नाटक संपल्यानंतर सारी पात्रे आपण पात्रे आहोत हे विसरून आपल्या खऱ्या व्यक्तिमत्त्वाने रंगभूमीवर येतात. यात नाटकात मेलेली पात्रेही सामिल असतात. नाटक संपले व आपण वास्तव जिवनात आलो याचाच तो संकेत असतो. अशा भरतवाक्यात ईश्वराची प्रार्थना असते किंवा समकालीन राजाची स्तुती असते. नाटकातल्या राजाची नव्हे. अर्थात या भरतवाक्यात उल्लेखिलेला अग्निमित्र हा मालविकाग्निमित्राच्या प्रयोगाच्यावेळी राज्य करीत असलेला राजा आहे, नाटकातील पात्र अग्निमित्राचे पात्र नव्हे. कालिदास अग्निमित्र शुंगाचा समकालीन होता याचा यापेक्षा दुसरा कोणता मोठा पुरावा पाहिजे ?

असे असताना मिराशींचा दुराग्रह इतक्या थराला गेला आहे की त्यांनी या मताचे खंडन करताना 'तथापिदमस्तु भरतवाक्यम' हे शब्द गाळून वरील श्लोक उद्धृत केला आहे व या श्लोकात नाटकातला राजा अग्नीमित्र मी राज्य करीत असताना प्रजेचे अकल्याण कसे होईल असे विचारत आहे अशी सारवासारव केली आहे. मालविका ही विदर्भराजकन्या आहे व राजाला अर्पण करण्यासाठीच पाठविण्यात आली आहे हे उघड झाल्यावर अग्निमित्र व मालविका यांच्या विवाहातली सर्व विघ्ने दूर होतात. तेव्हा राजाची पहिली राणी मालविका देखील या विवाहाला मान्यता देते व तुझे आणखी काय प्रिय करू ? असे राजाला विचारते. याला उत्तर म्हणून राजा पहिल्या दोन ओळीत म्हणतो, "तू माझ्यावर नेहमी प्रसन्न अस" (म्हणजे नवी सवत आणल्याबद्दल रागावू नकोस) (मलाही) तू नेहमी माझ्यावर प्रसन्न रहावीस हेच नेहमी हृदयात बाळगले पाहिजे. अर्थात राणीच्या हातात राजाचे जे काय प्रिय करण्याचे सामर्थ्य होते ते एवढेच ते मागून झाल्यावर तिच्या देकाराचे उत्तर पूर्ण झाले.

### यवन आणि हूण

हे उत्तर पूर्ण झाल्यावर पुढच्या दोन ओळींचे प्रयोजन उरत नाही. राणीला प्रसन्नतेची विनंती केल्यावर माझ्या राज्यात सर्वत्र आबादीआबाद आहे" अशा तऱ्हेची बढाई पूर्णपणे असंबद्ध आहे. त्यामुळे पहिल्या दोन ओळीनंतर नाटक संपले हे स्पष्टपणे दाखविण्यासाठी 'तथापिदमस्तु भरतवाक्यम्' हे शब्द कविने लिहिले आहेत.

कालिदास शुंगकालीन असल्याचा दुसरा निर्णायक पुरावा त्याने केलेल्या रघुच्या दिग्विजयवर्णनात आढळतो. रघूने

इराणवर स्वारी करून यवनांचा पराभव केला व नंतर वंक्षूंच्या तीरावरील हूणांचा पराभव करून त्याचे घोडे श्रमपरीहार करण्यासाठी लोळले व त्यांनी आपल्या माना झटकल्या तेव्हा त्यांच्या आयाळांना लागलेले वंक्षूंच्या तीरावरील केसारांचे पराग भूरूभुरू हवेत उडाले. वंक्षु म्हणजे OXUS हे वर्णन गुप्त कालाला गैरलागू आहे. गुप्तांच्या काली गन्धार व इराण येथे ग्रीक राज्य करीत नव्हते तसेच गुप्तांच्या साम्राज्याची सरहद्द वंक्षू नदीला भिडलेली नव्हती. चन्द्रगुप्त विक्रमादित्याच्या काळी गुप्त साम्राज्यावर हूणांची स्वारी देखील झालेली नव्हती. तेव्हा चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या हूण व ग्रीक यांच्याशी संघर्ष होण्याचे कारण नव्हते व तसा संघर्ष झाल्याचे उल्लेखही नाहीत. उलट पुष्यमीत्र शुंगाने ज्या मौर्यांचे साम्राज्य बळकाविले होते त्यांच्या राज्यात गन्धारचा समावेश होत होता व त्याची सिमा वंक्षूला भिडलेली होती. किंबहुना वक्षूंचा काही भाग त्यांच्या राज्यातच असण्याचा संभव आहे. मौर्यांच्या पडत्या काळात ग्रीकांनी गांधार जिंकून घेतला होता व इराणवर त्यांचे राज्य अलेक्झांडरच्या काळापासून होते. पुष्यमित्र शुंगाने मौर्याराज्य बळकावल्यावर अश्वमेघ यज्ञ करून यज्ञाचा घोडा ज्याला ब्रिटीश काळात वायव्यसीमाप्रांत म्हणत त्या गंधारच्या भागात घुसविला. तो सिंधूच्या दक्षिण तीरावर ग्रीक सैन्याने अडविला. सिंधूची उत्तर व दक्षिण तीरे फक्त गंन्धार मध्ये आहेत. या ग्रीक सैन्याचा पुष्यमित्राचा नातू वासुमित्र याने पराभव केला व घोडा सोडविला. अश्वमेधाच्या नियमाप्रमाणे गंधार प्रांत पुष्यमित्राच्या आधीन झाला असे म्हणता येते. असे झाल्यावर शुंग राज्याची सरहद्द इराणला भिडली व तेथील ग्रीकांशी देखील शुंगांचा संघर्ष होण्याची परिस्थिती उद्भवली. त्याचप्रमाणे पूर्वेकडील वंक्षूंच्या काठावरील हुणांशी देखील संघर्षाचीच परिस्थिती निर्माण झाली कारण या हुणांच्या त्रासापासून वाचण्यासाठी चीनने आपली प्रसिद्ध भिंत बांधली. अशा राजकीय परिस्थितीत कालीदासाला ग्रीक व हुण यांच्यावर एका भारतीय सम्राटाने विजय मिळविल्याचे वर्णन करण्याची बुद्धी होणे सहज आहे.

कालिदास शुंगकालीन असल्याचा दुसरा पुरावा म्हणजे मेघदूतात विदिशा नगरी ही राजधानी होती असे वर्णन आहे. विदिशा ही अग्निमित्राची राजधानी होती, गुप्तकालात ती कुणाची राजधानी असल्याचा उल्लेख नाही.

तिसरा पुरावा असा की रघुवंशामध्ये कालीदासाने रघूने दक्षिणेतल्या पाण्ड्य राजांचा पराभव केला असे वर्णन आहे. म्हणजे पाण्ड्य राजे हेच त्यावेळी दक्षिणेत सर्वात बलाढ्य होते याचीच पुष्टि करणारे पाण्ड्य राजाचे वर्णन पुढे सहाव्या सर्गात आहे. ते पाण्ड्य राजे शुंग कालात दक्षीणेतले बलाढ्य राजे होते. त्यांची राजधानी उरगपुर ही नसून मदुरा ही होती. चालांनी पाण्ड्यांचा पराभव केल्यावर त्यांनी आपली राजधानी उरगपुरावरून मदुरेला हलविली. तेव्हा गुप्त कालातला कालिदास पाण्ड्य राजाला 'उरगपूरचा नाथ' असे म्हणणार नाही.

### शेक्सपीअरने खाडीलकरांची नाटके चोरली

यावर मिराशींची तोड अशी की मदुरा या शब्दाचा तामिळ भाषेत साप असाच अर्थ होतो, म्हणून कालीदासाने मदुरेलाच उरगपुर म्हटले. कालिदासासारखा उत्तरेतला कवी मदुरा हे प्रसिद्ध नाव सोडून मदुराशब्दाचा अर्थ काय होतो याचा शोध घेऊन मदुरेला उरगपुर म्हणेल अशी कल्पना करणे हा शुद्ध दुराग्रह आहे.

हाच दुराग्रह अश्वघोषापासून कालिदासाने उसनवारी केली असा कालिदासावर आरोप करण्यापर्यंत मजल मारतो. कालिदासाचे 'न ययौ न तस्थौ' म्हणजे शिवाला पाहून पार्वती गेलीही नाही व थांबलीही नाही म्हणजे जाण्याचा आव आणून घुटमळतच राहीली हे शब्द जसेच्या तसे अश्वघोषात

आढळतात. त्याचप्रमाणे 'नवं वयः कान्तर्मिद वपुश्च' हे कालिदासाचे प्रसिद्ध शब्द 'कान्त्या' ऐवजी 'दीप्त' घालून अश्वघोषाने वापरले आहेत. काव्यप्रतिमेच्या बाबतीत अश्वघोष हा कालिदासाच्या जवळपासही बसू शकत नाही. असे असताना कालिदासानेच अश्वघोषाचे अनुकरण केले असे म्हणणे शेक्सपीअरने खाडिलकरांचे अनुकरण केले असे म्हणण्यासारखे आहे.

या अडचणीतून सुटण्याची मिराशींची युक्ती मासलेवाईक आहे. 'प्रागेव' हा शब्द महायान बौद्धांचा आहे, तो अश्वघोषात येतो, तोच कालिदासाच्या सुरूवातीच्या ऋतुसंहार काव्यात आला आहे, नंतरच्या काव्यात मात्र तो त्याने वापरला नाही, यावरून कालिदास अश्वघोषानंतरचा आहे असा त्यांचा युक्तीवाद आहे. कालिदासाने नंतरच्या काव्यात 'प्रागेव' शब्द वापरला नाही हे म्हणणे निराधार आहे. रघुवंशात 'प्रागेव मुक्ता नयनाभिरामा प्राप्येन्द्रनीलं किमुतोन्मयूखम्' म्हणजे मोती आधीच सुंदर त्यात त्याचा इंन्द्रनीलाशी मिलाफ झाल्यावर काय विचारावे ? असे वाक्य आहे. 'प्रागेव' म्हणजे आधीच, प्राक् म्हणजे पूर्वी व एव म्हणजे च. 'प्रागेव' हा शब्द अमरकोशादि ग्रंथात नाही त्याअर्थी तो बौद्ध शब्द आहे असा मिराशींचा युक्तीवाद आहे. पण 'प्रागेव' हा एक शब्द नाहीच, प्राक् व एव या दोन शब्दांचा संन्धि होऊन तो बनला आहे, तेव्हा 'प्रागेव' असा कोणता शब्द कोशात कसा येईल ? प्राक् व एव हे दोन्ही शब्द कोशात आहेत.

आणि 'प्रागेव' या शब्दावर महायान बौद्धांची मालकी कशी काय ? खिस्तकालातले बौद्ध हे संस्कृत रचनेत नवशिके होते, ते संस्कृतातील प्रथितयश ग्रंथकारांचे अनुकरण करतील की संस्कृतातले कविकुलगुरूच बौद्धांचे अनुकरण करतील ?

तात्पर्य अश्वघोषावर कालिदासाचा प्रभाव आहे, अश्वघोष खिस्तोत्तर पहिल्या शतकात झाला तेव्हा कालिदास त्याच्या पूर्वीचा हे सिद्ध आहे.

अश्वघोष व कालिदास यांच्या पौर्यापर्याबद्दल वाद आहे. पण भास कालिदासाच्या आधी झाला याबद्दल काही संदेह नाही. तरीपण भासाची 'चक्रारपंक्तिरिव गच्छति भाग्यपंङ्क्तिः' ही ओळ कालिदासाच्या 'नीचैर्गच्छत्युपरि व दशा चक्रनेमिक्रमेण' या ओळीचे पूर्वरूप वाटते. भास कालिदासाच्या तोडीचा कवि नही तरी कालीदासावर त्याची छाया कशी ? असा प्रश्न विचारण्यात येईल. पण येथे हे लक्षात ठेविले पाहीजे 'भाग्यचक्र' ही कल्पना कोणत्याही कवीची पृथकात्म कल्पना नाही. तो केवळ संस्कृतच नव्हे तर जगातील सर्व भाषातील वाक्प्रचार झाला आहे. भासाच्या व कालिदासाच्या ओळीत भाग्य हे एक चक्र आहे एवढेच साम्य आहे. भासाने चक्रच्या आरींना भाग्यपक्ती म्हटले आहे तर कालीदासाने चक्राला नेमीला म्हणजे जे चक्राकार तुकडे जोडून पूर्ण चक्र बनविण्यात येते त्या तुकड्यांना भाग्य म्हटले आहे. कालिदासाची उपमा अधिक सार्थ आहे कारण चक्राचे आर त्याच्या मध्यालाच खोचलेले असतात. त्यामुळे ते खाली गेले तरी त्यांच्या उन्नतीत फार तर चाकाच्या भोकाइतका म्हणजे एखाद्या इंचचा फरक पडू शकतो.

### कालीदासाची जन्मभूमी

उलट नेमि म्हणजे चक्रचा भाग खाली जातो तेव्हा पूर्णपणे जमिनीला टेकलेला असतो व वर जातो तेव्हा चाकाच्या उंचीइतका वर जातो. तेव्हा कालीदासाची उपमा अधिक सार्थ आहे. भासाची 'चक्रारपङ्क्तिरिव गच्छति भाग्यपङ्क्तिः' ही ओळ कालीदासाच्या वाचनात आली असली तरी 'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रमिक्रमेण' ही त्याची ओळ तिचा प्रतिध्वनी नसून पूर्णपणे स्वतंत्र रचना आहे.

या प्रमाणे कालीदासाचा खिस्तपूर्व १५० हा काळ निश्चित

होतो. या काळात झालेला कालीदास कुठे जन्मला व कुठे राहत होता याची चर्चा पंडितांनी केली आहे. कालिदास अग्निमित्राच्या पदरी होता असे मानल्यावर तो विदिशेत राहत होता हे ओघानेच आले. पण कालिदास अग्निमित्राच्या कालात झाला एवढ्यावरच तो अग्निमित्राचा दरबारी कवि होता असे सिद्ध होत नाही. मालाविकाग्निमित्र हे त्याचे पहिले नाटक होते व तो त्यावेळी प्रथितयश झाला नव्हता हे त्यानेच लिहिले आहे. पण मालविकाग्निमित्र प्रकाशित होण्याच्या काळी नसला तरी कालिदास स्वतःच्या हयातीतच प्रथितयश झाला होता हे निश्चित, व प्रथितयश झाल्यावर अग्निमित्राने त्याला आश्रय दिला असला पाहिजे.

त्याच्या निवासस्थानाबद्दल असा वाजवी तर्क करता येत असला तरी पुढे जाऊन त्याया जन्मस्थानाबद्दल अनेकांनी भरमसाट तर्क केले आहेत. बंगाली संशोधकांचे म्हणणे आहे की कालिदास बंगाली होता. कशावरून तर त्याचे कालिदास हे नाव कालीच्या पूजेसाठी प्रसिद्ध असलेल्या बंगालमधले नाव वाटते. दुसरे असे की तो 'आषाढस्य प्रथम दिवसे' या मेघदूतातील ओळीत बंगालच्या बाहेरील प्रथेप्रमाणे आषाढ शुद्ध वा कृष्ण प्रतिपदेला असे न म्हणता आषाढाच्या पहिल्या दिवशी असे म्हणतो. हे बंगालमधील सौव पंचांगाला अनुसरून आहे. एवढ्या आधारावरून बंगाली लोकांनी कालिदासाला किती बायका होत्या, त्या कोणत्या निरनिराळ्या ठिकाणी राहत होत्या वगैरे कथा लिहिल्या आहेत. कालिदासाचा जन्म गडा शिंगरू या मुर्शिदाबाद जिल्ह्यातील गावी झाला असेही त्यांनी निश्चित केले आहे व तेथे कालीदासाचे मोठे स्मारक बांधण्याची त्यांची योजना आहे.

वरील समजुतींना ऐतिहासिक महत्त्व नाही हे वाचकांना सहज कळण्यासारखे आहे. बंगाल कालीच्या पूजेसाठी प्रसिद्ध असला तरी भारतभरच थोड्या फार प्रमाणात कालीची पूजा होते. तसेच जुन्या शिलालेखातून तिथींच्या उल्लेखाऐवजी दिवसाच्या उल्लेख करण्याची पद्धत होती हे दाखवून देता येते.

कालिदासाची जन्मभूमी काश्मिर असल्याचे दुसरे एक मत आहे. कालिदासाने हिमालयाची वर्णने फार आत्मीयतेने केली आहेत हा या मताचा आधार आहे. कालिदासाने साऱ्या भारताचे वर्णन आत्मीयतेने केले आहे, केवळ हिमालयाचेच नव्हे.

कालिदास विदर्भातला होता असे मत पीटर्सनने मांडले

[redacted]

**कालिदास वैदर्भिय होता.**

शोधक याचा अर्थ साफ करणारा असा होतो. मार्ग साफ करणारा म्हणजे खुला करणारा किंवा बनवणारा. मार्ग करताना दगडधोंडे व झाडेझुडपे साफ करावी लागतात. एवढे केले की मार्ग तयार झाला असे म्हणता येते. साफ केलेल्या मार्गावर दगडबंदी करणे हे पक्का रस्ता बनविण्यासाठी आवश्यक आहे, साधारणपणे बैलगाड्या वगैरे जाण्यासाठी साफ करण्याचे काम झाले की रस्ता तयार झाला असे समजण्यात येते. तेव्हा कालिदासाने वैदर्भमार्ग तयार केला तो वैदर्भी रीतीचा प्रवर्तक होता असे दंडीला म्हणायचे आहे असे दिसते. हा अर्थ मानला तर कालिदास वैदर्भीय असल्याशिवाय त्याने प्रसृत केलेल्या रीतीला वैदर्भी असे नाव पडण्याचे कारण दिसत नाही.

कालिदासाने वैदर्भीरीति नवीन काढली नसून ती शुद्ध केली असाही अर्थ, दण्डीच्या ओळीतून निघतो. पण वैदर्भी रीति शुद्ध करणे म्हणजे काय व ती अशुद्ध झाली होती म्हणजे काय झाले होते हे प्रश्न अनुत्तरीत राहतात.

कालिदासाच्या पूर्वी वैदर्भि रीति बरीच प्रचलित होती पण ती लुप्त झाली व वैदर्भ मार्गावर झाडेझुडपे वाढून तो मार्ग वापरात राहिला नाही तो कालिदासाने वापरात आणला असाही अभिप्राय असू शकतो. पण कालिदासाने ज्यांचे अनुकरण करावे असे महान कवि विदर्भात झाले होते व ते खिस्तपूर्व १५० पूर्वी झाले होते असे यासाठी मानावे लागेल. पण असे मानण्यास पुरावा नाही. कालिदासाच्या पूर्वी झालेल्या भास, सौमिल्ल व कविपुत्र यांच्या शैलीला वैदर्भी मानले तरी ते विदर्भातले होते याला यत्किंचितही पुरावा नाही. तेव्हा कालिदास हाच वैदर्भीरीतीचा प्रवर्तक व तो स्वतः वैदर्भ असल्यामुळे या रीतीला वैदर्भी म्हटले गेले असे अनुमान वाजवी आहे.

ही वैदर्भीरीती म्हणजे काय तर तिचे प्रतितिसुगम वचः असे दण्डीने लक्षण केले आहे. "प्रतीतिसुगम" म्हणजे जे समजण्यास सुलभ असल्यामुळे सुंदर वाटते ते. केवळ समजण्यास सोपी असल्यामुळे शैली वैदर्भी होत नाही. तिच्यात सुबोधतेबरोबरच सौन्दर्याची देखील प्रतिती झाली पाहीजे. नुसती सुबोधता रामायण – महाभारताच्या शैलीत देखील आहे. किंबहुना सुबोधतेचा विचार केला तर कालिदासाची शैली रामायण – महाभारताच्या शैलीपेक्षा कठिणच आहे.